नि .दि.दावा क्र. ५०/२०२३
मानिकराव वि. महा. शासन
निशाणी क्र. ३५ आणि ४३

वादीतर्फे साक्षीदार क्र.१ मानिकराव दामाजी ठाकरे,
मी शपथेवर सांगतो की,

<u>उलटतपास प्रतिवादी १ ते ५ तर्फे -</u>

प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहहजर.

सबब, उलटतपास नाही.

<u>उलटतपास प्रतिवादी ६ ते ११ सुविद्य विधिज्ञ श्री. गुप्ता यांद्वारे -</u>

हे म्हणणे खरे आहे की शेत सर्वे नं.८० ला लागुन पांधन रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की पांधन रस्त्याचा उपयोग गावातील लोक जाण्यायेण्यासाठी करत होते. हे म्हणणे खरे आहे की पांधन रस्त्यांचा उपयोग, बैलगाडी जाण्यायेण्यासाठीदेखिल होत होता. हे म्हणणे खरे आहे की माझ्या शेताच्या पलीकडे प्रतिवादी क्र.६ ते ११ यांची शेतजमिन आहे. पांधन रस्त्याच्या पलीकडे प्रतिवादींची शेती आहे. प्रतिवादी सावित्राबाई, गजानन, सुरेश, डोमा आणि नरेश हे पांधन रस्त्याचा उपयोग करत नाही, फक्त रामकृष्ण हा पांधन रस्त्याचा उपयोग करतो. मोजणी करतांनी प्रतिवादींन मी नोटीस दिली नव्हती. सर्वे नं.८० च्या सातबाराची आराजी ही २ हे. ४३ आर आहे. ग्रामस्त लोक दमदाटी करत आहे म्हणुन मी पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.६ ते ११ यांनी मोजणीच्या वेळी कोणताही त्रास दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी व ग्रामस्त यांना जाण्यायेण्याचा अडथळा व्हावा या उददेशाने त्यांना पक्षकार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादींचा काही संबध नसतांना त्यांना पक्षकार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI
L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.03.13 16:48:31 +0530

दिनांक १३/०३/२०२५ (एस.एम. सरोदे)

रामटेक दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)